ग्राम पंचायतींना यात्रा कराऐवजी
<u>वित्तीय सहाय्य.</u>

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
शासन निर्णय, क्र. पंरास-१०८६/२५०६/प्र.क्र. २४४९/२२,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक २ जून १९९२,

<u>वाचा/पहा</u> :- शासन निर्णय , ग्राम विकास विभाग, क्र. व्हीपीएफ-१३७८/१२७७/
सी आर-१४४/२३-अ, दिनांक ५ मे १९९१,

<u>प्रस्तावना:-</u> ज्या ग्रामपंचायतींचे यात्रा करांचे निव्वळ वार्षिक उत्पन्न [कर वसुलीसाठी लागणारा खर्च वजा करता] रू. ५०००/- रु पेक्षा जास्त आहे, अशा ग्राम - पंचायतींनी यात्रा कर न आकारल्यास, त्यांना अशा उत्पन्नाच्या ७५% इतके अनुदान नुकसान भरपाई म्हणून द्यावयाचा आदेश वरील शासन निर्णयान्वये दिलेला आहे. ज्या ग्रामपंचायती असे यात्राकर अनुदान मिळण्यास पात्र आहेत, त्या ग्राम पंचायतींनी त्यांना यात्राकरांपोटी नुकसान भरपाई म्हणून मिळालेल्या अनुदानापैकी किमान ५० % रक्कम त्यांच्या कार्यक्षेत्रात येणा-या यात्रेकरूंच्या कल्याणासाठी खर्च करण्याची अट त्यांच्यावर घालण्यात आले आहे. ग्राम पंचायतींनी यात्रेकरूंच्या कल्याणासाठी उपलब्ध करून द्यावयाच्या आवश्यक सुविधा /सेवांवरील वाढलेला खर्च, तसेच, यात्रेकरूंची वाढलेली संख्या लक्षांत घेता, ग्राम पंचायतींना सधा मिळत असलेल्या यात्राकर अनुदानात तिप्पटीने वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय:-</u> शासनाने या प्रकरणी आता असा निर्णय घेतला आहे की, ग्राम - पंचायतींना सध्या शासनाकडून मिळत असलेल्या अनुदानांमध्ये तिप्पटीने वाढ करून यात्राकर अनुदान सन १९९२-९३ या वित्तीय वर्षापासून देण्यात यावे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र. ९२३८/प्र.क्र. ४५१ /९२,/व्यय-१५ दिनांक ३२ मे १९९२ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. कृ. जगताप
२/६/९२
[ अ.कृ. जगताप ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन,

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी.
-8 JUN 1992

..२/-